# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)



## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १८० व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

## गुरुवार, दि.२४ जुलै, २०२४ दुपारी ०४:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८० वी (तातडीची) ऑनलाईन बैठक **बुधवार, दि.२४ जुलै, २०२४ रोजी दुपारी ०४:०० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | अनुपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | अनुपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture jointly with INNOeVERSITY as execution partner, referred to as MACCIA-INNOeVERSITY, Mumbai यांचेमध्ये OJT बाबत सामंजस्य करार करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसूदा श्री. मनिष पाटील, मुंबई यांनी विद्यापीठास पाठविला असून सदर सामंजस्य कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून चारही विद्याशाखांतर्गत पदवी अभ्यासक्रम NEP-२०२० आराखड्यानुसार सुरु करण्यात आले आहेत. सदर आराखड्यानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना OJT/FP पूर्ण करणे आवश्यक आहे. याकरिता विविध संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्याचे काम विद्यापीठाकडून सुरु आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून विद्यापीठ संकुले पदव्युत्तर पदवी विभागात NEP-२०२० प्रमाणे अभ्यासक्रम राबविले जात आहेत. या संदर्भात Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture jointly with INNOeVERSITY as execution partner, referred to as MACCIA-INNOeVERSITY, Mumbai यांच्या संयुक्त विद्यमाने OJT संदर्भात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.<br>श्री. मनिष पाटील, Maharashtra Chamber of Commerce, Mumbai यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture jointly with INNOeVERSITY as execution partner, referred to as MACCIA-INNOeVERSITY, Mumbai यांचे मध्ये OJT संदर्भात सामंजस्य करार करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसूदा विद्यापीठास पाठविला आहे. सदर मसूदा विद्यापीठातील MoU Cell च्या दिनांक २४/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत ठेवला असता सदर MoU चा मसूदा तपासला असून, सामंजस्य करार करण्यासंबंधी शिफारस केली आहे. | अभ्यासमंडळे विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture jointly with INNOeVERSITY as execution partner, referred to as MACCIA INNOeVERSITY, Mumbai यांचेमध्ये OJT बाबत सामंजस्य करार करण्यासंबंधी MoU Cell समितीने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व** Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture jointly with INNOeVERSITY as execution partner, referred to as MACCIA - INNOeVERSITY, Mumbai **यांचेमध्ये** OJT **बाबत सामंजस्य करार करण्यासाठीच्या मसूद्यास व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसूदा श्री. संतोष कदम, CSIR-NCL, पुणे यांनी विद्यापीठास पाठविला असून सदर सामंजस्य कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे, १९५० मध्ये स्थापित, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेची (CSIR) एक घटक प्रयोगशाळा आहे. CSIR- NCL ही विज्ञान आणि ज्ञानावर आधारित संशोधन, विकास आणि सल्लागार संस्था आहे. हे रसायनशास्त्र आणि रासायनिक अभियांत्रिकीमधील वैज्ञानिक संशोधनातील उत्कृष्टतेसाठी तसेच संकल्पनेपासून व्यावसायीकरणापर्यंत उद्योगाशी भागीदारी असलेल्या औद्योगिक संशोधनाच्या उत्कृष्ट ट्रॅक रेकॉर्डसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखले जाते.<br>राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे याच्या सोबत प्रस्तुत विद्यापीठाने सामंजस्य करार केल्यास NEP-२०२० नुसार विद्यार्थ्यांना OJT/FP पूर्ण करण्यासाठी तसेच संशोधक विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, शास्त्रज्ञांना या सामंजस्य कराराचा फायदा होईल. प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. कुलगुरु कार्यालयाकडून राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे यांच्या समवेत सामंजस्य कराण्याकरिता दिनांक ११/०६/२०२४ रोजी ईमेल पाठविला होता. त्यास अनुसरुन श्री. संतोष कदम, CSIR-NCL, पुणे यांनी सामंजस्य करार करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसूदा विद्यापीठास पाठविला आहे. सदर मसूदा विद्यापीठातील MoU Cell च्या दिनांक २४/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत ठेवला असता सदर MoU चा मसूदा तपासला असून, सामंजस्य करार करण्यासंबंधी शिफारस केली आहे. (प्रत संलग्न)<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यासंबंधी MoU Cell समितीने केलेली शिफारस विचारार्थ. | प्लेसमेंट सेल विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यासाठीच्या कराराच्या मसूद्यास व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद